# गोदातीर समाचार

परभणी/हिंगोली मंगळवार दि. १८ मार्च २०२५

# कथा, कवितेच्या माध्यमातून वैविध्यपूर्ण जीवन अनुभवांचे सादरीकरण

## परभणीत 'साहित्य मंच' उपक्रम संपन्न



**परभणी/प्रतिनिधी**

मानवी जीवनातील नातेसंबंधांवर भाष्य करणार्‍या कथा आणि रंगतदार कवितांच्या माध्यमातून येथे 'साहित्य मंच' हा कार्यक्रम पार पडला. कथा व कविता वाचनांच्या माध्यमातून लेखक, कवींनी आपले वैविध्यपूर्ण जीवन अनुभव यावेळी विशद केले. साहित्य अकादमी व श्री. शिवाजी महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम शनिवारी (दि.१५) घेण्यात आला.

येथील श्री. शिवाजी महाविद्यालयाच्या सभागृहात पार पडलेल्या या कार्यक्रमात बा.बा. कोटंबे, मिलिंद जाधव यांनी कथा वाचन केले तर मोहन कुलकर्णी, केशव खटींग, संतोष नारायणकर यांनी कविता वाचन केले. या कार्यक्रमाला शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी.यु. जाधव, डॉ. आसाराम लोमटे यांची उपस्थिती होती. प्रारंभी लोमटे यांनी प्रास्ताविकात 'साहित्य मंच' या उपक्रमामागील हेतू विशद केला.

प्रारंभी कोटंबे यांनी 'पडझड' या कथेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील कुटुंब व्यवस्थेतील पेच सांगितला. बदलत्या काळाचा परिणाम कुटुंबातल्या नात्यावर कसा होतो हे या कथेतून त्यांनी सांगितले तर मिलिंद जाधव यांनी 'खुलासा' या कथेतून एका मध्यमवर्गीय कुटुंबातल्या नाट्यावर प्रकाश टाकला. या दोन्ही कथांना उपस्थितांनी दाद दिली.

मोहन कुलकर्णी यांनी यावेळी 'बंद खिडकीच्या आत', 'पाऊस, काही टिपणं', 'देह सजवायचा' या कविता सादर केल्या.

सताड उघड्या खिडकीच्या गजातून
तिनं आभाळ ठिबकताना पाहिलं
आणि स्वत:च्याच पापणओल्या
डोळ्यातून ती मोर नाचवत राहिली

या त्यांच्या ओळींना उपस्थितांनी दाद दिली. 'ऋतुंचे बरे असते, अंगाखांद्यावरून, नव्हे सर्वांगावरून वाहून जातात निर्लज्जपणे पुढे पुढे.' ही त्यांची ऋतुंविषयीची कविता त्यांनी सांगितली.

कवी केशव खटींग यांनी यावेळी 'मॉर्गेज', 'दिस कडूशार झाले', 'लेक म्हणजे कवितेचं प्रत्यक्ष रूप' या कविता सादर केल्या. पहिल्या कवितेत कर्जबाजारी शेतकर्‍याची व्यथा त्यांनी सांगितली तर दुसर्‍या कवितेत ढासळलेल्या गावगाड्याचे त्यांनी वर्णन केले तर 'लेक म्हणजे कवितेचं प्रत्यक्ष रूप, तिच्याशी बोलताना कोणत्याही बापाला मायेची हळुवार आंतरिक लय सापडते. मंदिरातली कास्याची घंटा वाजावी आणि आवाजाची आवर्तनं घुमत जावीत हवेत तशी लेक असते बापाच्या भावविश्वात' या त्यांच्या ओळींना उपस्थितांनी भरभरून दाद दिली.

कवी संतोष नारायणकर यांनी 'देव परिक्षा घेतात', 'कपड्यांचा संदुक', 'दोन पाय, दोन हात' या कविता सादर केल्या. 'अशीच एकदा त्यांनी माझी विचारली होती जात, मी म्हणालो काय सांगु, दोन पाय दोन हात' या कवितेतून त्यांनी सामाजिक जाणीव सांगितली.

जसे येतात दिवस तसेच
निघून जातात
बघतो तर काय, काहीच
नसते हातात

या कवितेतून त्यांनी अभावग्रस्त दिवसांचे वर्णन केले. अध्यक्षीय समारोप प्राचार्य बी.यु. जाधव यांनी केला. या कार्यक्रमाचे संचलन प्रा. बडुरे यांनी केले तर आभार प्रा. प्रल्हाद भोपे यांनी मानले.

या कार्यक्रमाला ज्येष्ठ कवी केशव बा. वसेकर, रेणू पाचपोर, सरोज देशपांडे, तुकाराम खिल्लारे, राजेंद्र गहाळ, प्रा. भगवान काळे, गंगाधर गायकवाड, माणिक पुरी, प्रा. जयंत बोबडे, प्रा. सखाराम कदम, सुरेश हिवाळे, अरूण चव्हाळ, शरद ठाकर, बालासाहेब जाधव, दत्ता चव्हाण, त्र्यंबक वडसकर, प्रा. प्रविण पुरी, प्रा. मयुरी शिंदे, प्रा. सारिका पाखरे, प्रा. स्वाती देशमुख, मारोती डोईफोडे, माणिक रासवे सुरेश पेदापल्ली आदींसह रसिकवाचक उपस्थित होते.